वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत विविध कार्यालयांतील आहरण व संवितरण अधिकारी यांना "आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक (VPDAA)" म्हणून घोषित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन शुद्धीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४२/अलेप
गो.ते.रूग्णालय आवार, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई -४०००0१
दिनांक : १२ मे, २०२६.

वाचा : वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४२/अलेप, दि.२५.३.२०२५.

**शासन शुद्धीपत्रक :-**

सहायक अनुदानाच्या जलद संवितरण व नियंत्रणासाठी आहरण व संवितरण अधिकारी आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकारी यांचेकरिता आभासी वैयक्तिक ठेव लेखा (Virtual Personal Deposit Account) ही व्यवस्था व कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत क्षेत्रिय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना वित्त विभागाच्या सहमतीने आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक Virtual Personal Deposit Account Administrator (VPDAA) म्हणून वाचा येथील दि.२५.३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे.

२. सदर आदेशातील खालील संस्थांसमोरील पदनाम व नाव सुधारीत केल्यानुसार वाचावे :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शासन निर्णयात नमूद पदनाम | सुधारीत पदनाम व नाव (यानुसार वाचावे) |
|---|---|---|---|
| १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर | प्रशासकीय अधिकारी, अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय नागपूर |
| २ | पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली | आहरण व संवितरण अधिकारी, सर्वोपचार रुग्णलय, सांगली | आहरण व संवितरण अधिकारी, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली |
| ३ | छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर | प्रशासकीय अधिकारी, सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर | प्रशासकीय अधिकारी, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर |
| ४ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज. जि. सांगली | आहरण व संवितरण अधिकारी, वैद्यकीय महाविद्यालय, मिरज | आहरण व संवितरण अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | आहरण व संवितरण अधिकारी, सर्वोपचार रुग्णालय, मिरज | आहरण व संवितरण अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज |
| ६ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर |
| ७ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छ.संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय दंतवैद्यक महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर |
| ८ | सह. प्राध्यापक, आरोग्य शिक्षण पथक, तासगाव, जि. सांगली | प्रशासकीय अधिकारी, आरोग्य पथक, तासगाव, जिल्हा सांगली | सहयोगी प्राध्यापक, आरोग्य शिक्षण पथक, तासगाव, जिल्हा सांगली. |
| ९ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, छ.संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, अतिविशेषोपचार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर |

३. सदर शासन शुद्धीपत्रक वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.७७/२०२६/को.प्र.५, दि.३/३/२०२६, लेखा व कोषागारे संचालनालय यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.१८.३.२०२६/१५९ व महालेखापाल (ले. व अ.) कार्यालयाचा अनौपचारिक **संदर्भ क्र.**TM.CH.2/UOR NO.353/वै.शि. व औ.द्र. वि./2026-27/176, दि.५.५.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१२१०३६२४६८१३ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
SWAPNA NILESH
DESHPANDE
Date: 2026.05.12 10:58:18
+05'30'

( स्वप्ना देशपांडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५. प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६. प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई / नागपूर.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर.
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष संचालनालय, मुंबई.
११. उप सचिव (प्रशासन / शिक्षण), वै.शि.व औ.द्र.वि., मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग, (कोषा-प्रशा-५), मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (अलेप).